**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९१/२०१९** | **दिनांक ११/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०५/११/२०१९ ते ११/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १२/११/२०१९ सकाळी ८:३० पासून १६/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/११ | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ | ११/११ | | १२/११ | १३/११ | १४/११ | १५/११ | १६/११ |
| ०.० | ०.० | ०.० | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.० | ३३.० | ३३.० | ३१.५ | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २३.५ | २३.० | २३.५ | २३.५ | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| ८ | ४ | ४ | ४ | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | १ | १ | १ | ६ |
| ९८ | ९६ | ९० | ८४ | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९६ | ९६ | ९६ | ९६ | ९६ |
| ६० | ५९ | ६७ | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ७९ | ७९ | ७९ | ७९ |
| २.० | २.३ | ३.३ | ४.५ | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ७ | ८ | ६ | ६ |
| उ. | शांत | इ.पु. | उ. | - | - | - | वाऱ्याची दिशा | ई.पू. | पू. | पू. | ई.पू. | पू. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| ०.० | | | | | | | ५२२२.१ | | | ३५५८.३ | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहून आकाश निरभ्र राहील.**

**दिनांक ८ ते १४ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पक्व अवस्था** | • पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या भात पिकाची कापणी व मळणी उरकून घ्यावी. |
| **नागली** | **पक्व अवस्था** | • पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या नागली पिकाची कापणी व मळणी उरकून घ्यावी. |
| **वाल/ कडवा वाल** | **पेरणी** | • खरीप भात कापणी नंतर जमिनीच्या अंगओल्यावर विनामशागत वाल/ कडवा वाल पिकाची पेरणी करण्यासाठी भात कापणीनंतर शेतातील तणांचे ग्लायफोसेट (५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून) या अनिवडक तणनाशकाचा वापर करून नियंत्रण करावे. त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकण पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. पेरणी करते वेळी बियाण्याशेजारी भोक करून त्यामध्ये दाणेदार मिश्रखत गुंठ्यास एक किलो या प्रमाणे दयावेत.<br>• खरीप भात कापणी नंतर जमिनीची मशागत करून वाल पिकाची पेरणी करावयाची असल्यास जमिनी वाफसा स्थितीत आल्यावर नांगरट करून हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्टखत मिसळून जमीन समपातळीत आणून वाल बियाण्याची ३० ते ४५ किलो प्रति हेक्टरी प्रति हेक्टरी बियाणे टोकण पद्धतीने ३० x १५ से. मी. किंवा ३० x २० से. मी. किंवा ३० x ३० से. मी. अंतरावर करावी. पेरणीच्या वेळेस ५४० ग्रॅम युरिया आणि ३ कि.ग्रॅ सिंगल सुपर फॉस्फेट प्रती गुंठा ओळीमध्ये बियाण्याखाली साधारण ५ सें.मी. खोलीवर दयावे. पेरणीनंतर हलके पाणी दयावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळावे व त्यानंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात रायझोबियम या जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया पेरणीपूर्वी १ तास आधी व बुरशीनाशकानंतर करून बियाणे सावलीत सुकवावे. |
| **आंबा** | **पालवी** | • दमट हवामानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>• निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. पहिल्या वर्षी आठवडयातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी दयावे. |
| **काजू** | **पालवी** | • दमट हवामानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी.<br>• निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पंधरा दिवसाच्या अंतराने १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| **नारळ** | **-** | • निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या बागेस ६ ते ७ दिवसांच्या आणि पूर्ण वाढलेल्या माडास जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची |

| | | |
|---|---|---|
| | | व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | **रोपवाटिका** | • रब्बी भाजीपाला रोपवाटीकेतील रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम युरियाची मात्रा द्यावी.<br>• भाजीपाला रोपवाटीकेतील पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वाली भाजीपाला लागवड करण्यासाठी भात कापणी नंतर जमिनी वाफसा स्थितीत आल्यावर नांगरट करून हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळून ३ X ३ मीटर आकाराचे सपाट वाफे तयार करावेत. पेरणी ६० x ६० से. मी. अंतरावर २ ते ३ बियाणे टाकून करावी. पेरणीच्या वेळेस प्रत्येक वाफ्यास ६० ग्रॅम युरिया, ३०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट आणि ४५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश दयावे. पेरणीनंतर हलके पाणी दयावे.<br>• कलिंगडाची लागवड सरी पद्धतीने २ x ०.५० मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १.५ किलो शेणखत, ११ ग्रॅम युरिया, ३२ ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट आणि १० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश प्रती आळ्यास खताची मात्रा द्यावी तसेच संकरीत कलिंगडाला लागवडीच्या वेळेस २ किलो शेणखत, २० ग्रॅम युरिया, ३२ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश प्रती आळ्यास खताची मात्रा द्यावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी थायरम किंवा कॅप्टन बुरशीनाशक ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. पेरणीनंतर हलके पाणी दयावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**• अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**